**शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि वाणिज्य विभाग कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर, जिल्हा. सांगली**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**बी. कॉम . भाग दोन या वर्गाच्या**

**"Business Administration (Marketing Management) Paper III"**

**सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा**

**सोमवार, दि. 15 सप्टेंबर, 2025**

# कार्यशाळा अहवाल

**उद्घाटन समारंभ :**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी. कॉम . भाग दोन या वर्गाच्या **Business Administration (Marketing Management) Paper III** या विषयाची सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा आज आपल्या कॉलेजमध्ये आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. ॲड. एन. आर. पाटील (अध्यक्ष, महात्मा फुले शिक्षण संस्था) उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून मा. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे उपस्थित होते. तसेच प्रा. डॉ. जे. जी. मुलाणी, संपतराव माने कॉलेज, खानापूर आणि वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. प्रा.डॉ. अशोक शिंदे , कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड आणि उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी राज्यशास्त्र विषयाचे ८६ प्राध्यापक सहभागी झाले होते.

उद्घाटन समारंभाचे स्वागत व प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सी. जे. भारसकळे यांनी केले. या ही कार्यशाळा कोणत्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आली आहे हे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. ॲड. एन. आर. पाटील म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विविध विषयाचे अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडून तयार केले जात

आहेत. या बदललेल्या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विविध ठिकाणी कार्यशाळा मंजूर करून तेथे प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य विद्यापीठ करीत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नवीन आव्हानाला सामोर जाण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थ्यांसाठी कौशल्यावर आधारित विषय आणत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्या बदललेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण दिवसभर घ्यावे ह्या दोन्ही कार्यशाळेच्या प्रशिक्षणासाठी तज्ञ मार्गदर्शक आलेले आहेत. ते आपल्याला विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने या विषयाचे अध्यापन करावे तसेच आपल्याला कोणती अडचण येणार नाही यासाठी हे प्रशिक्षण उपयोगी होणार आहे.




उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये झालेल्या बदलाचा आढावा घेत कोणती आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत व त्यांना आपण कसे सामोरे गेले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.




या सत्राचे आभार वाणिज्य शाखेचे प्रा. संदीप पाटील यांनी व्यक्त केले तर सूत्रसंचालन सौ. पूजा कुपाडे यांनी केले.

**बीजभाषण सत्र :-**

प्रा. डॉ. जे जी मुलाणी बीजभाषण देताना म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाच्या सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्याच्या मध्यवर्ती आपले कॉलेज असल्यामुळे वाणिज्य अभ्यास मंडळाने आपल्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजला बी.कॉम भाग दोन वाणिज्य विषयाच्या बदलेल्या अभ्यासक्रमाची कार्यशाळा मंजूर केलेली आहे आणि मला आनंद वाटतो की या तिन्ही जिल्ह्यातून सर्व प्राध्यापक आलेले आहेत.

पुढे ते म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षकाने विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख बनवावे आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध स्वरूपाची कौशल्य विकसित करावी तसेच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी कोणत्या आहेत याची माहिती करून द्यावी म्हणजे आपला विद्यार्थी जगाच्या स्पर्धेमध्ये टिकेल यासाठी आपण वाणिज्य विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळेच सर्व शिक्षकांना बदललेल्या अभ्यासक्रमासंबंधी प्रशिक्षणाची व्यवस्था या कार्यशाळेच्या माध्यमातून केलेली आहे.

त्यामुळे आपण सर्वांनी या सुधारित अभ्यासक्रमाच्या कार्यशाळेत प्रशिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने अध्यापन करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या कार्यशाळेसाठी जे तज्ञ मार्गदर्शक आहेत त्यांचे मी स्वागत करतो आणि आपल्या सर्वांना दिवसभरासाठी शुभेच्छा देतो.




बीजभाषण **सत्राच्या अध्यक्ष** प्रा.डॉ. अशोक शिंदे यांनी बीजभाषणाचा आढावा घेतला आणि ही कार्यशाळा या कॉलेजने आयोजित करून आमच्या वाणिज्य विषयाच्या प्राध्यापकाना सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेत सहभागी होण्याची संधी दिली त्याबद्दल मी के. बी. पी. कॉलेजचे आभार मानते.

**सत्र पहिले:-**

पहिला सत्रामध्ये प्रा. डॉ. प्रतिभा जगताप यांनी व्यावसायिक प्रशासन या पेपरमधील **प्रकरण एक - विपणनाची ओळख व उत्पादन व किमत निर्णय** या दोन प्रकरणावर अतिशय अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली. या प्रकरण एक मधील विपणनाचा अर्थ, वैशिष्ट्ये व प्रक्रिया यावर आणि प्रकरण दोन मधील उत्पादन घेत असताना घ्यावयाचे निर्णय, उत्पादनाचे जीवन चक्र आणि आधुनिक युगात किमतीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

या प्रकरणातील विविध मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली त्यानंतर प्रश्न उत्तर या चर्चेसत्रात अनेक शिक्षकाने प्रश्न विचारले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे अतिशय अभ्यासपूर्ण अशी देण्याचे काम त्यांनी केलेले आहे.




या सत्राचे अध्यक्ष म्हणून **प्रा. डॉ. पोर्णिमा चव्हाण** हे उपस्थित होत्या. त्यांनीही या दोन्ही प्रकरणामध्ये कोणते मुद्दे महत्वाचे आहेत? आपण विद्यार्थ्यांना हा विषय कसा शिकवावयाचा याविषयी मांडणी केली.

**सत्र दुसरे :-**

या दुसऱ्या सत्रामध्ये प्रमुख साधन व्यक्ती म्हणून प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी प्रकरण तीन व चार मधील प्रकरणामधील वितरणाचे विविध मार्ग. त्याचे महत्त्व आणि जाहिरातीचे महत्त्व सांगितले. त्यानंतर **प्रकरण चार मधील** आधुनिक काळातील विपणनातील ग्रामीण विपणन, ऑनलाइन विपणन व हरित विपणन यासारख्या संकल्पना सविस्तरपणे मांडल्या. तसेच प्रश्न पत्रिकेच्या स्वरूप याविषयी चर्चा केली आणि त्यानंतर अनेक शिक्षकांनी प्रश्न विचारले त्यावर त्यांनी अभ्यासपूर्ण अशी उत्तरे देऊन सदर सत्र संपले.




**कार्यशाळा समारोप समारंभ:-**

कार्यशाळा समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी सुधारित अभ्यासक्रमाच्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेऊन चांगल्या पद्धतीने अध्यापन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली . या कार्यशाळेसाठी जे तज्ञ मार्गदर्शक आणि सहभागी प्राध्यापक, या कॉलेजचे प्राचार्य आणि वाणिज्य विषयाचे प्राध्यापक उपस्थित आहेत. आपल्या सर्वाचे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आभार मानतो .

कार्यशाळा समारोप समारंभाचे अध्यक्ष डॉ अमोल सोनावणे आणि डॉ.पी. बी. लुपने, डॉ. मोहसीना मुलाणी इत्यादी उपस्थित होते.कार्यशाळेचे आभार प्रा.डॉ. सी. जे. भारसकळे यांनी मानले तर कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु. आश्लेषा पाटील यांनी मांडले.

Head
Department of Commerce
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist-Sangli-415409

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409